# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**प्रश्नपुस्तिका क्र.** **CS2021**

**BOOKLET No.**

# D

**Total Que.: 80**

**Mob. No. 9923262977**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2021**

**Marks : 200**

**Date : 19/12/2021**


**विषय : — पेपर— II (C-SAT) [444]**

**Time : 2 hrs.**

## सूचना

१. सदर प्रश्नपुस्तिकेत ८० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता **काळ्या बॉलपेनने** लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे **श्रेयस्कर** आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

५. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

६. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील**.''

www.spandancareers.org

**खाली दिलेले परिच्छेद वाचा आणि प्रत्येक परिच्छेदावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नमूद करा. या प्रश्नांची उत्तरे परिच्छेदावर आधारित असली पाहिजेत.**

**प्र. क्रमांक १ ते ३**

लग्न सोहळ्यांच्या बाबतीत सुध्दा आपल्याकडे जाती–जातींनुसार वगवेगळ्या चालीरिती आहेत. हिंदू धर्म त्याच्यातल्या जातींसाठी कुठल्याही प्रकारची सामाईक पध्दती विहित करत नाही. ज्या पध्दतीने माझा विवाहसोहळा पार पडला त्याच पध्दतीने माझ्या नोकराच्या मुलाचा विवाह पार पडू शकणार नाही. 'विशेष विवाह कायद्यातील' तरतुदीप्रमाणे माझा व माझ्या भावांचे विवाह पार पडले. यालाच नागरी विवाह असे म्हणतात. जो सर्वासाठी खुला किंवा उपलब्ध आहे. ही पध्दत सर्वांसाठी सारखीच आहे. सार्वत्रिक नसलेल्या व एखाद्या विशिष्ट जातीपुरत्याच मर्यादित असलेल्या गृहस्थाश्रम प्रदेशाच्या कर्मकांडाला माझे वडील स्वीकारूच शकत नव्हते आम्हाला या प्रकारच्या विवाहासाठी वीस रूपयापेक्षा जास्त रक्कम मोजावी लागली नाही. विवाहसोहळ्याकरिता प्रचंड प्रमाणात उधळपट्टी करण्याचा माझ्या वडिलांना तिटकारा होता. जिथे हुंडा दिला गेला असेल अशा कुठल्याही लग्न समारंभांना ते उपस्थित राहत नसत. राज्य विधिमंडळ आणि संविधान सभा या दोहोंचे सदस्य असलेले ते एक उच्चपदस्थ व्यक्ती होते. त्यांच्या मते, सामाजिक क्षेत्रातील नेते आणि उच्चपदस्थ व्यक्ती ज्यांची खर्च करण्याची क्षमता आहे, त्यांनी स्वत: साधेपणा व कमीत कमी खर्चाचा पायंडा पाडून समाजाचे नेतृत्व करावे.

गांधीजी खाजगी जीवनातल्या अशा वर्तणुकीला वैयक्तिक आचारसंहिता असे म्हणत. आपण, विशेषत: सार्वजनिक जीवनातील ख्यातनाम लोक दुहेरी आयुष्य जगतो; एक खासगी आयुष्य आणि दुसरं अगदी त्याच्याविरूध्द असं सार्वजनिक आयुष्य या दुटप्पी चारित्र्याला मोठा मानसन्मान देऊन आपण त्याचा स्वीकार केलेला आहे. गांधीजींनी याचे वर्णन 'दुभंगलेले व्यक्तिमत्व' असे केले आहे. भंग पावलेले व्यक्तिमत्व हा विकृतपणाचा परिपाक आहे. वैद्यांच्या मते, माथेफिरूपणावर उपचार शक्य आहे परंतु दुभंगलेल्या व्यक्तिमत्वावर नाही. गांधीजींच्या चळवळीचा जोर 'एकात्म व्यक्तिमत्वाची' उभारणी करण्यावर होता.

सामाजिक कार्यकर्त्यांचे वैयक्तिक आयुष्य आणि चारित्र्य ही त्याची खाजगी बाब असल्याने त्याकडे दुर्लक्ष करावयास हवे. अशा पध्दतीची नवी भाषाच आपण स्वातंत्र्योत्तर काळात बोलायला लागतो आहोत. त्याच्या सार्वजनिक जीवनाशी आणि सार्वजनिक ध्येयधोरणांशी याचा काहीही संबंध नाही असेच मत बनले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या खाजगी आयुष्याची चिंता आपण का वाहावी? आपण निर्लज्जपणे हे विचारतो अशा प्रकारच्या ढिसाळ चर्चेचे तत्वज्ञानच आपण उभे केले आहे.

अस्पृश्यतेबद्दलची आपली वृत्तीसुध्दा याच दुटप्पी बोलण्याच्या पध्दतीने बाधित आहे.

**प्र. १. वरील उताऱ्यावरून खालीलपैकी कोणते निष्कर्ष काढता येतील.**

अ. सर्वांनी 'विशेष विवाह कायद्यातील' तरतुदीप्रमाणे विवाह केले पाहिजेत.
ब. उताऱ्याचे लेखक हे गांधीजींचे सुपुत्र आहेत.
क. सामाजिक कार्यकर्त्यांच्या खाजगी व सार्वजनिक आयुष्यात एकरूपता असणे हे लेखकाच्या मते गरजेचे आहे.

१. ब व क २. फक्त अ ३. फक्त क ४. अ, ब, क

---

**प्र. २. ''वैद्यांच्या मते माथेफिरूपणावर उपचार शक्य आहे परंतु दुभंगलेल्या व्यक्तिमत्वावर नाही'' या वाक्यातून काय सुचित होते?**

१. 'दुभंगलेल्या व्यक्तिमत्वावरच्या' उपचारांबाबत अजून संशोधन झालेले नाही.
२. दुभंगलेले व्यक्तिमत्व हा असाध्य रोग असून भारतीय वैद्य उपचार करण्यास समर्थ नाहीत.
३. वरील १ आणि २ दोन्ही
४. दुभंगलेल्या व्यक्तिमत्वाची बीज समाजाच्या स्वार्थी मानसिकतेत दडलेली असल्याने वैद्यकशास्त्राचा थेट उपयोग नाही.

---

**प्र. ३. वरील उताऱ्यात 'उद्देश' काय सांगण्याचा आहे?**

१. लेखकांच्या वडिलांची सामाजिक बांधिलकी
२. गांधींचे तत्वज्ञान
३. अस्पृश्यता निवारणाबद्दलची वृत्ती
४. सामाजिक उन्नतीसाठी उच्च मुल्याची सार्वजनिक व खाजगी जीवनातली एकसमानता.

---

**प्रश्न क्रमांक ४ ते ६:**

जर एखाद्याला भारतीय इतिहासाच्या सुरूवातीच्या कालखंडातील निवेदन आणि तेही भारतीय स्त्रोतांमधून हवे असेल तर अशी निवेदने काही 'पुराणांमध्ये' सापडू शकतात. इसवी सनाच्या पहिल्या सहस्त्रकात लिहिली गेलेली यातील काही पुराणे असा दावा करतात की त्यातल्या घटकांचे संदर्भ त्याआधीच्या काही सहस्त्रकांमधील गोष्टींचे आहेत. पृथ्वीवर मनुंचे राज्य होते आणि सातव्या मनुच्या काळात खूप मोठा महापूर आला ज्यात सर्वकाही बुडून गेले. विष्णुच्या सल्ल्यानुसार मनुने एक मोठी नौका बांधली जी त्याला आणि सप्त ऋषींना त्या पुरातून घेऊन जाऊ शकेल. विष्णुने मत्स्यावतार घेतला आणि मनुने त्याच्या शिंगाला आपली नाव जोडून घेतली. तो मासा त्या पाण्यातून पोहून गेला आणि ती नौका सुरक्षितपणे पर्वताच्या शिखरावर पोचली. जेव्हा पुराचे पाणी ओसरेल तेव्हा मनु पुन्हा आपल्या स्वगृही परतला. पुढे मनुची ही पिढी पुढच्या वंशावळीसाठी पूर्वज म्हणून स्थापित झाली. नंतरचे जे राजे आपल्या उच्च खानदानीपणाच्या शोधात होते त्यांनी स्वत:ची ओळख इथपर्यंत मागे आणलेली दिसते. यानंतरच्या वंशावळींमध्ये अनुक्रमाने येणारी इतिहासातील ज्ञात राजसत्तांची यादी आहे. मिथकांच्या तथ्यांवर भर देऊन निवेदनाला मर्यादा घालण्याऐवजी ऐतिहासिक दृष्टीच्या स्तरावर प्रकाशझोत टाकणे हा हेतू यामुळेच स्वीकारलेला आहे. समांतर असणाऱ्या प्राचीन पश्चिम आशियातील सारख्याच घटनांचे हितसंबंध या मिथकांमध्ये गुंतलेले आहेत.

महत्वाची बाब म्हणजे भारतीय इतिहासाचा हा सुरूवातीचा काळ कुठल्याही प्रकारे 'आर्य' हे मुळचे पूर्वज आहेत असा उल्लेख करत नाही. अंशत: याचे कारण असे असू शकते की 'आर्य' ही संकल्पना वांशिक संदर्भात बहुतेक नसावी. पुराणातील वंशावळीतील नावे ही आर्य किंवा अनार्य



www.spandancareers.org

म्हणून आलेली नाहीत आणि त्यातल्या काहींचा वंश हा स्पष्टपणे संदिग्ध आहे. यामुळेच पारंपारिक दृष्टीमध्ये आर्य ही संकल्पना अस्तित्वात नाही. परंतु पुढे यात बदल होऊन, म्हणजे एकोणिसाव्या शतकात इतिहासासंबंधीच्या निवेदनात 'आर्य' या संकल्पनेचा उदय हा भारतीय इतिहासाचा पाया आणि निवेदनाचे मध्यवर्ती सूत्र म्हणून आणलेला दिसतो. ही नंतरची आवृत्ती 'वेद' या वेगळ्याच हितसंहितावर आधारलेली होती; ज्यांच्या सुरूवातीच्या संहिता पुराणांच्या आधी जवळजवळ पंधराशे वर्षे होत्या. मग प्रश्न असा उभा राहतो की वेदांमध्ये आणि त्यानंतच्या इतर संहितांमध्ये आर्य म्हणून ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे ती काय आहे आणि आर्य नावाच्या या संकल्पनेची बांधणी का आणि कशी झाली आणि त्यात काय काय बदल होत गेले. हा अकादमिक प्रश्न नसून अस्मितांची निर्मिती सतत कशी होत जाते आणि प्रत्येक सभ्यतेच्या संपूर्ण ऐतिहासिक प्रक्रियेत ती कशी बदलली या दृष्टीने मध्यवर्ती प्रश्न आहे.

**प्र. ४. उताऱ्यामध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मिथके या संकल्पनेविषयी खालीलपैकी कुठली विधाने तार्किकदृष्ट्या बरोबर आहेत?**

१. 'मिथके' ही अचूक असतात त्यामुळे इतिहासकारांनी त्यावर विश्वास ठेवला पाहिजे.

२. समकालीन गोष्टीविषयी मिथकांचे हितसंबंध असू शकतात त्यामुळे त्यांच्यावर ती 'परिपूर्ण' आहेत असा विश्वास एखाद्याला ठेवता येणार नाही.

३. 'मिथके' पूर्णपणे काल्पनिक असतात.

४. यांपैकी नाही.

---

**प्र. ५. उताऱ्यामधून कुठला संदेश देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे?**

१. 'आर्य' ही चुकीची अस्मिता किंवा ओळख आहे.

२. पुराणांमध्ये अनेक जादूई/अद्भुत गोष्टींचा समावेश आहे.

३. अस्मिता/ओळख या बनवल्या जातात त्यामुळे त्यामध्ये चलाखीने बदल केले जाऊ शकतात

४. वरील सर्व १, २, ३

---

**प्र. ६. 'नंतरचे राजे' त्यांच्याविषयी उताऱ्यावरून कुठला निष्कर्ष काढता येतो?**

१. सर्व 'नंतरच्या राजांनी' त्यांचा मूळ वंश म्हणून 'मन' ला स्वीकारले.

२. 'नंतरच्या काही राजांमध्ये' खानदानीपणाचा दर्जा मिळवण्याची प्रवृत्ती दिसते.

३. १ आणि २ दोन्ही

४. 'नंतरचे राजे' हे दुटप्पी वर्तन करणारे होते.

---

**प्रश्न क्रमांक ७ ते ९:**

जेव्हा क्रिकेट खेळण्याची सुरूवात झाली तेव्हा त्याच्याकडे सभ्य लोकांचा खेळ म्हणून पाहिले जायचे. अजूनही इंग्रजी भाषेत जेव्हा तुम्हाला एखादी गोष्ट चुकीची आहे असे म्हणायचे असते तेव्हा ''हे क्रिकेट नाही'' अशी म्हण वापरली जाते.

त्याकाळी इंग्लिश क्रिकेटमध्ये दोन मुख्य गट होते. त्यातला एक गट होता जो क्रिकेट त्यावरच्या प्रेमापोटी खेळायचा आणि त्यातून त्याला कुठलाही मोबदला मिळत नसे. त्यांना ''सभ्य'' असे संबोधले जात असे आणि दुसरे म्हणजे जे उदरनिर्वाहाकरिता क्रिकेट खेळत, त्यांना मौसमाकरिता आणि त्यांच्या प्रत्येक डावाकरिता मोबदला मिळत असे, त्यांना ''खेळाडू'' असे म्हणत.

इंग्लंडमध्ये बहुतांश क्रीडांगणामध्ये या खेळाडूंसाठी वेगळी प्रवेशद्वार आणि बाहेर जाण्याचे रस्तेही वेगळे असत. याचबरोबर 'सभ्य' आणि 'खेळाडू' या दोघांच्या ड्रेसिंग रूम्ससुध्दा वेगवेगळ्या असत. 'सभ्य' म्हणजे असे लोक ज्यांना कळले की आपण बाद झालो आहोत तेव्हा ते स्वत: मैदान सोडून जात आणि 'खेळाडू' म्हणजे जे पंचांच्या निर्णयाची वाट पाहत असत आणि अंदाज घेत असत, अपेक्षा करत असत की कदाचित पंचांनी काही पाहिलं नसेल किंवा त्यांनी काही ऐकलं नसेल म्हणून जेव्हा पंचांना योग्य निर्णय देणं शक्य नसायचं तेव्हा निश्चितच काही असेही 'सभ्य' होते जे त्यांच्या स्थानाचा आणि परिस्थितीचा गैरवापर करून घेण्याचा प्रयत्न करत असत. अशा वेळी नेहमीच हे 'सध्य' चूक करूनही त्यातून सहीसलामत कुणालाही कळू न देता या परिस्थितीत वेळ मारून न्यायचे कारण त्याच्याबद्दल असा समाज होता की ते उदरनिर्वाह म्हणून किंवा पैसे कमावण्यासाठी खेळत नाहीत आणि त्यामुळेच ते अशा संदिग्ध परिस्थितीचा फायदा घेणार नाहीत आणि कायम खरीच भूमिका घेतील.

पुढे इसवी सन १९५० च्या दशकाच्या सुरूवातीच्या काही वर्षात जेव्हा असं लक्षात आलं की काही 'सभ्य' लोकांना यातून मिळणारे मानधन या व्यावसायिक खेळाडूंपेक्षा जास्त आहे तेव्हा 'सभ्य' आणि 'खेळाडू' यांच्यामधील हा फरक नष्ट व्हायला लागला. हळूहळू क्रीडांगणाची वेगवेगळी प्रवेशद्वारं सुध्दा निघून गेली आणि त्याचबरोबर वेगवेगळ्या ड्रेसिंग रूम्ससुध्दा! या सगळ्यांच्या बरोबर समस्यांची एक मोठी साखळीच आली ज्यामुळे पंचावर आणि खेळावरही प्रचंड दडपण आले.

**प्र. ७. वरील उताऱ्यावरून कुठले निष्कर्ष काढता येतील?**

अ. इंग्लंडमध्ये 'सभ्य' या गटाविषयी ते खेळाविषयी प्रामाणिक असतात असा सर्वसाधारण समज सुरूवातीच्या काळात होता.

ब. 'खेळाडू' या गटातील क्रिकेट खेळणारे हे सामाजिक जीवनात अनीतिने व असत्याने वागणारे लोक होते.

क. आज क्रिकेट हा 'सभ्य' लोकांचा खेळ राहिलेला नाही.

१. फक्त अ २. ब व क ३. फक्त क ४. यांपैकी एकही नाही.

---

**प्र. ८. पंचावर आणि खेळावर प्रचंड दडपण येण्यामागे काय कारण असू शकते?**

१. 'खेळाडू' गटाच्या लोकांनी 'सभ्य' लोकात मिसळणे.

२. 'सभ्य' गटाला 'खेळाडू' पेक्षा जास्त पैसे मिळणे.

३. 'सभ्य' आणि 'खेळाडू' अशा गटांच्या एकत्रिकीकरणातून पुढे निर्माण होऊ शकणारे नैतिक पेच

४. खूप जास्त सामने खेळण्यामुळे होणारे कामाचे दडपण

---

**प्र. ९. खालीलपैकी कुठली विधाने उताऱ्यातील आशयाला पुष्टी देणारी आहेत?**

अ. सर्व 'सभ्य' क्रिकेटशी प्रामाणिक होते.

ब. सर्व 'सभ्य' लोकांची आर्थिक परिस्थिती प्रचंड श्रीमंतीची होती.

क. सर्व 'खेळाडू' प्रचंड गरीब होते.

१. अ व क २. ब व क ३. अ, ब आणि क ४. यापैकी नाही

---

**प्रश्न क्रमांक १० ते १२:**

दमरूहाट येथील मध्यवर्ती शाळेचे विद्यार्थी–शिक्षक–संसाधने यांचे गुणोत्तर एकमेकाद्वितीय असे आहे, आतापर्यंत तरी त्या शाळेत आठ इयत्ता आहेत, सात शिक्षक आहेत, चार विद्यार्थी आहेत, दोन वर्गखोल्या आहेत एक तुटकी खुर्ची आहे.

ही खुर्ची मुख्याध्यापकांसाठी आरक्षित आहे जे सध्या अफरातफरीच्या आरोपावरून निलंबित आहेत. इथल्या मध्यवर्ती शाळाच्या मुख्याध्यापकांना त्या त्या भागातील शिक्षकांच्या प्रकार वाटपाचे अधिकार असतात. इथल्या मुख्याध्यापकाने अस्तित्वात नसलेल्या शिक्षकांना पगार दिल्याने उपायुक्त चिडले आणि त्यांनी त्यांची उचलबांगडी केली.

दोन इतर शिक्षकांची बदली केली गेली आहे. शाळेत आता एकूण चार शिक्षक आहेत आणि विद्यार्थ्यांची जास्तीत जास्त पटसंख्या असते दहा ते बारा (तिथे विद्यार्थी नोंदणी साधारणत: पंच्याहत्तर इतकी आहे) एकेकाळी तर फक्त दोनच विद्यार्थी हजर असायचे. ''खाजगी शिकवण्यामध्ये सुध्दा असं काही होत नाही – एका विद्यार्थ्यामागे दोन शिक्षक!'' तिथल्या गोड्डा येथील महाविद्यालयाचे प्राध्यापक सुमन दरधियार म्हणतात.

यापेक्षा भयाण परिस्थिती आदिवासी खेड्यांमध्ये आहे. डोंगराळ भागातील बोर्जिओर गटातल्या आदरो गावातील शिक्षक श्यामसुंदर माल्तो यांनी तर गेल्या दोन वर्षांपासून शाळेला तोंडच दाखवलेले नाही. आम्हाला त्या शाळेत पोचायला चौदा कि.मी. चालत जाव लागलं आणि तेही अत्यंत बिकट अशा प्रदेशातून. आता त्या शाळेचा वापर तेंदूची पानं आणि मका साठवण्यासाठी केला जातोय.

माल्तो दोन वर्षापूर्वी शाळेला रामराम करून गेला आणि जाताना हजेरीच्या नोंदवह्या सोबत घेऊन गेला. ''तो या हजेरी वह्यांमध्ये घरी बसून नोंद करतो आणि पगार घेतो'', तेथरीगोड्डाचा पहारिया आदिवासी मधुसिंह सांगत होता. जेव्हा मधुसिंहच्या नेतृत्वाखालील चिडलेले गावकरी त्याला जाब विचारायला त्याच्या घरी गेले तेव्हा माल्तोने त्यांच्याविरूध्द खुनाचा प्रयत्न, मारहाणी असे गुन्हे दाखल केले. ते खटले अजून प्रलंबित आहेत.

गोड्डा गावाजवळच्या नूनमट्टी या खेड्यात अत्यंत दारिद्र्यात असलेल्या कहार जमातींची वसाहत आहे. तिथल्या प्राथमिक शाळेतील एकमेव हुशार विद्यार्थी म्हणजे तिथली काळ्या रंगांची बकरी आणखी दोन बकऱ्या तिथल्या भिंतीजवळ शांतपणे बसून असतात. कहार जमातीतील एकही मूल या शाळेत जात नाही जरी त्यांच्यातल्या दोघांची 'नावनोंदणी' तिथे झाली आहे.

**प्र. १०. उताऱ्यात वर्णन केलेल्या प्रदेशातील शाळांच्या स्थितीविषयी खालीलपैकी कुठली विधाने योग्य आहेत?**

अ. येथील शाळांची स्थिती वाईट असली तरी लेखक आता तिथे सुधारणा कार्यास सुरूवात करणार आहे.

ब. खेड्यातील लोकांची शिक्षणा प्रतिची उदासीनता प्रामुख्याने या समस्येचे कारण आहे.

क. 'अपुऱ्या सोयीसुविधा' हे सर्वात महत्वाचे कारण येथील शाळांच्या दुर्दशेमागे आहे.

१. अ व ब २. फक्त अ ३. अ, ब, क ४. यापैकी नाही

---

**प्र. ११. वरील उताऱ्यामधून लेखकाला प्रामुख्याने काय सांगावयाचे आहे?**

१. भारतातील भ्रष्टाचार २. आदिवासींचे दारिद्र्य ३. १ आणि २ दोन्ही ४. यापैकी नाही

---

**प्र. १२. 'प्राथमिक शाळेतील एकमेव हुशार विद्यार्थी म्हणजे काळ्या रंगाची बकरी' यातून लेखकाला काय सूचित करावयाचे आहेत?**

१. 'नूनमट्टी' मधील आदिवासी 'बकरीपाल' मोठ्या प्रमाणावर करतात.

२. आदिवासीच्या बकऱ्या निसर्ग सान्निध्यात असल्याने चलाख असतात.

३. शाळेत नसलेले विद्यार्थी आणि रिकामी शाळा.

४. वरील सर्व १, २ आणि ३

---

**प्रश्न क्रमांक १३ ते १५:**

मसुरीच्या पत्यावर तुला पाठवलेल्या पत्रांमध्ये, मनुष्याच्या विकासाबरोबर त्याचे वेगवेगळे वर्ग कसे घडत गेले हे दाखवून देण्याचा प्रयत्न मी केला होता. सुरूवातीच्या काळात मनुष्यासाठी साध अन्न मिळवणं सुध्दा खूप जिकिरीचं होतं. ते रोजच्या रोज शिकार करून फळफळावळ आणि इतर अन्न मिळवित असत आणि एका जागेवरून दुसऱ्या जागेवर अन्नाच्या शोधात भटकंती करीत असत हळूहळू यातून जमाती किंवा टोळ्यांचा उदय झाला. ही खरंतर भलीमोठी कुटुंबचं होती जी एकत्र राहत आणि शिकारही करत, कारण एकटे राहण्यापेक्षा एकत्र राहणे जास्त सुरक्षित होते. त्यानंतर एक मोठ्ठा बदल घडून आला. तो म्हणजे शेतीचा शोध लागला. ज्यामुळे खूप काही बदललं लोकांना शेतीच्या साहाय्याने भूमीवर अन्न पिकवणं सतत शिकारीच्या शोधात फिरण्यापेक्षा खूप सोपं वाटलं. नांगरणी, पेरणी, काढणी या गोष्टींमुळे त्याच जमिनीवर राहणंही सुरू झालं. आत ते पूर्वीसारखे इकडेतिकडे फिरू शकत नव्हते; त्यांना त्यांच्या शेताजवळचं राहणे गरजेचे होते. त्यातूनच खेडी आणि गावांचा उदय झाला.

कृषी व्यवसायाने आणखी काही बदल केले. एका वेळच्या गरजेपेक्षा काही अधिक अन्न जमीन पिकवू लागली होती. हे जास्तीच किंवा अधिकच पीक मग साठवून ठेवायला सुरूवात झाली. यातून आधीच्या काळातील शिकारीच्या जगण्यापेक्षा नवीन जीवन थोडेसे आणखी गुंतागुंतीचे झाले, आणि लोकांचे वेगवेगळे वर्ग तयार झाले. त्यातले काही शेतीत आणि इतर कामात थेट भाग घेऊ लागले, आणि काही त्याच व्यवस्थापन आणि संयोजन करू लागले. हळूहळू हे व्यवस्थापक आणि संयोजक बाकीच्यांपेक्षा अधिक शक्तिशाली होऊ लागले. तेच नंतर पुरूषसत्ताक, शासक, राजे आणि सरदार झाले. अधिकच उत्पन्न किंवा अन्न यांचा बराचसा मोठा वाटा मग हेच लोक स्वत:च्या अधिकाराचा वापर करून स्वत:जवळ ठेवू लागले. त्यामुळे ते आणखी श्रीमंत झाले पण शेतात काम करणाऱ्यांना मात्र केवळ जगण्यापुरतचं अन्न मिळू लागलं. नंतर तर असा काळ आला की हे व्यवस्थापक आणि संयोजक इतके

आळशी आणि असमर्थ झाले की त्यांचं किमान काम म्हणजेच व्यवस्थापन करणेसुध्दा बंद झालं. त्यांनी नंतर काहीही केलं नाही. परंतु ते याची मात्र काळजी घेत की काम करणाऱ्या लोकांना उत्पादित केलेल्या अन्नाचा मोठा वाटा स्वत:कडे राहिल. नंतर ते विचार करू लागले की अशा प्रकारे स्वत: काहीही काम न करता इतरांच्या श्रमावर जगणं हा त्यांचा हक्कचं आहे.

**प्र. १३. वरील उताऱ्यात मुख्य आशय काय आहे?**

१. आदिमानव ते प्रगत मानव या काळात झालेली कृषीक्षेत्रातील प्रगती

२. इतरांच्या श्रमावर न जगता प्रत्येकाने कष्ट करायला हवेत हा संदेश

३. भौतिक साधने, राहणीमान आणि त्यातून शोषक, आणि इतर वर्गाचा मानवी समाजातील उदय व त्यांची घडण

४. वरील सर्व १, २ आणि ३

---

**प्र. १४. तुमच्या मते वरील उताऱ्यात आकृतीबंध (form) काय असावा?**

१. हा ऐतिहासिक निबंध आहे.

२. हे पत्रलेखन आहे.

३. सांगता येणार नाही, उताऱ्यावरून बोध होत नाही.

४. यापैकी एकही नाही.

---

**प्र. १५. 'व्यवस्थापक' आणि 'संयोजकांविषयी' पुढीलपैकी कुठला/कुठले निष्कर्ष काढता येतील?**

अ. पुढच्या काळातील राजकीय शक्तिस्थाने मिळणारे लोक हे असावेत.

ब. कष्टकऱ्यांचे शोषण हे यांचं वैशिष्ट्य असू शकतं.

क. ते कष्टकऱ्यांपेक्षा जास्त बुध्दिमान असल्याने त्यांची प्रगती झाली.

१. ब व क　　२. अ व ब　　३. फक्त ब　　४. अ, ब, क

---

**प्रश्न क्रमांक १६ ते १८:**

आई आज वारली किंवा कदाचित काल हे मला माहित नाही. मला घरून तार आली होती: 'आई वारली. उद्या अंत्यविधी आहे. कळावे' याचा काहीच अर्थ लागत नाही. कदाचित ते कालचंही असू शकेल.

अल्यियर्सपासून पन्नास मैलावर मरेंगे इथं वृध्दाश्रम आहे. मी दोन वाजताची बस पकडेल आणि दुपारपर्यंत तिथे पोचेन. त्यानंतर मी तिथे लक्षपूर्वक उपस्थित राहीन आणि उद्या रात्री पर्यंत परत येईन. मी माझ्या साहेबाला दोन दिवसांच्या रजेची परवानगी मागितली आहे आणि तो अशा परिस्थितीत ती नामंजूर करू शकणार नाही. परंतु त्याचा आविर्भाव मला काही ठीक वाटला नाही. मी त्याला एवढंही म्हणालो, ''ही काही माझी चूक नाही''. तो त्यावर काही बोलला नाही. नंतर माझ्या मनात विचार आला की मी असे काही बोलायला नको होते. सरते शेवटी मी यात माफी मागण्यासारखं काहीही नव्हतं. उलट त्याचीच जबाबदारी होती की, त्यांनी माझं सांत्वन करावं. कदाचित तो ते परवा वगैरे करेल, जेव्हा तो मला दु:खाने रडारड करताना पाहील. आता या क्षणासाठी तरी आई जणू काही जिवंतच आहे. अंत्यविधीनंतर मृत्यूवर तशी अधिकृत शिक्कामोर्तब होतं आणि या सगळ्या सोहळ्याला एक आणखी औपचारिक अधिष्ठान प्राप्त होतं.

मी दोनची बस गाठली. खूप उकडत होतं मी नेहमीप्रमाणे सेलेस्टीच्या उपहारगृहात खाऊन घेतलं. तिथं सगळ्यांनी माझ्याविषयी खूप हळहळ व्यक्त केली आणि सेलेस्टी म्हणाला. ''जगात आईसारखं कुणीचं नसतं''. जेव्हा मी खाऊन निघालो तेव्हा ते सगळे मला निरोप द्यायला दारापर्यंत आले. मी त्यावेळी एका वेगळ्याच चिंतेत आणि ती म्हणजे मला इम्यान्यूयलकडे जाऊन काळा टाय आणि दुखवट्याची दंडफीत घ्यायची होती. काही महिन्यांपूर्वीच त्याच्या काकांचही निधन झालं होत.

**प्र. १६. वरील उताऱ्यातील निवेदक तुमच्या मते कसा आहे?**

१. विकृत　　२. तटस्थ　　३. स्वार्थी　　४. आळशी

---

**प्र. १७. वरील उताऱ्यावरून खालीलपैकी कुठले निष्कर्ष काढता येतील?**

अ. निवेदक सोडून उताऱ्यातील इतर पात्रे ही सर्वसाधारण पध्दतीने प्रतिक्रिया देत आहेत.

ब. आईच्या मृत्युचा धक्का सहन न झाल्याने निवेदक काहीबाही बडबडतो आहे.

क. निवेदकाचे व त्याच्या आईचे सारखे वादविवाद होत असावेत.

१. अ आणि क　　२. अ आणि ब　　३. फक्त ब　　४. फक्त अ

---

**प्र. १८. ''....... आणि या सगळ्या सोहळ्याला एक आणखी औपचारिक अधिष्ठान प्राप्त होतं.......'' या वाक्यातून काय सूचित होते?**

१. कर्मकांडातील औपचारिकता　　२. कर्मकांडाची चेष्टा

३. १ आणि २ दोन्ही　　४. यापैकी नाही

---

**प्रश्न क्रमांक १९ ते २१**

श्री. पिकेटी आणि इतर अनेक अर्थतज्ज्ञांच्या एक दशकापेक्षा जास्त काळाच्या मेहनतीचा परिपाक म्हणजे 'कॅपिटल' होय. उत्पन्न आणि संपत्तीच्या एकवटीकरणाच्या ऐतिहासिक जडणघडणीची ही कहाणी आहे. प्रचंड मोठ्या माहितीच्या आधारावर औद्योगिक क्रांतीच्या सुरूवातीच्या काळापासून उत्क्रांत झालेल्या असमानतेविषयीचा पट—री पिकेटी मांडतात. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात पश्चिम युरोपिय समाजात मोठ्या प्रमाणावर असमानता होती. खासगी संपत्ती राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा कितीतरी अधिक होती आणि तीही अत्यंत कर्मठ अशा वर्ग संरचनेतील उच्च वर्गाच्या हातीच एकवटलेली होती. ही परिस्थिती औद्योगिकीकरणाने कामगारांच्या वेतन वगैरेमध्ये थोडीफार वाढ करवूनही टिकून राहिली. फक्त पाहिलं आणि दुसरं महायुद्ध आणि जागतिक

www.spandancareers.org

महामंदी या घटनांमुळे जो गोंधळाचा काळ आला त्यावेळी या परिस्थितीत थोडाफार बदल झाला. प्रचंड कर, महागाई, बुडालेल्या बँका आणि रांगणाऱ्या कल्याणकारी राज्याचा खोळंबलेला विकास यामुळे अतिशय नाट्यमयरीत्या संपत्ती आकुंचित पावली आणि एका नवीन काळाचा उदय झाला. ज्यात संपत्ती आणि उत्पन्नाचे आधीपेक्षा समातेने वाटप सुरू झाले. परंतु विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळातील संपत्तीवरचे हे धक्के नंतर कमी झाले आणि संपत्तीने तिची पूर्वीची प्रवृत्ती पुन्हा अधोरेखित केली. श्री. पिकेटींच्या मते आधुनिक अर्थव्यवहारातील हे संपत्तीचे महत्व किंवा प्रवृत्ती पहिल्या महायुध्दाच्या आधीसारख्याच परिस्थितीकडे झुकू लागले आहे.

या इतिहासावरून श्री. पिकेटी भांडवल आणि असमानता यांच सखोल सिध्दांतन करतात साध्या नियमांनुसार संपत्ती ही आर्थिक निर्मितीपेक्षा वेगात वाढत असते, हे ते समजावून देतात. इतर गोष्टी कायम ठेवून वेगवान आर्थिक वाढ ही संपत्तीच समाजातील महत्व कमी करत जाते असं दिसून येतं आणि कमी आर्थिक वृध्दी तेच महत्व वाढवत जाते. परंतु तिथे अशी कुठलीही नैसर्गिक प्रक्रिया नाही जी संपत्तीचे एकवटीकरण थांबवू शकेल. वेगवान वृध्दीचा उद्रेक (जो तंत्रज्ञानातील प्रगतीने किंवा लोकसंख्या वाढीने वाढू शकेल) किंवा शासकीय हस्तक्षेप केवळ या दोनच गोष्टी अर्थव्यवस्थेला ''पारंपरिक शोषक भांडवली'' (ज्याची मार्क्सला चिंता होती) व्यवस्थेकडे जाण्यास रोखू शकतात.

**प्र. १९. वरील उताऱ्यावरून खालीलपैकी कुठले निष्कर्ष काढता येतील?**

अ. औद्योगिक क्रांतिमुळे जगात सगळीकडे संपत्तीचे असमान वाटप सुरू झाले, त्याआधी सर्वत्र समानता होती.

ब. पहिल्या आणि दुसऱ्या महायुध्दामुळे जगाचा आर्थिक विकास थांबला.

क. युरोपिय समाज हा आर्थिक बाबतीत जगातील इतरांपेक्षा जास्त साक्षर आहे.

१. अ व ब २. ब व क ३. अ, ब, क ४. यापैकी नाही

---

**प्र. २०. तुमच्या मते री. पिकेटी कोण असावेत?**

१. मार्क्सवादी विचारवंत २. अर्थतज्ज्ञ ३. माहिती अपुरी आहे. ४. यापैकी नाही

---

**प्र. २१. उताऱ्यावरील कुठल्या गोष्टींमुळे समाजात आर्थिक समानता आल्याचे म्हटले आहे?**

अ. महागाई ब. पहिले महायुध्द क. औद्योगिक क्रांती ड. मार्क्सची विचारसरणी

१. अ, ब, ड २. अ, ब, क ३. अ, ब ४. अ, ब, क, ड

---

**प्रश्न क्रमांक २२ ते २५:**

देव आहे की नाही किंवा देव हा भ्रम की वास्तव तुम्ही कसंही विचारा या प्रश्नाचं उत्तर कुठलाही ग्रंथ, पुरोहित, तत्ववेत्ता किंवा रक्षक हे कुणीही देऊ शकणार नाहीत. कुणीच आणि काहीही याच उत्तर देऊ शकणार नाही परंतु केवळ तुम्ही आणि तुमच्याकडेच आहे याचसाठी तुम्हाला स्वत:ला ओळखावं लागेल. स्वत:बद्दलच्या अनभिज्ञतेतच खरा बालिशपणा दडलेला आहे. तुम्ही स्वत:ला ओळखण हीच ज्ञानाची, शहाणपणाची खरी सुरूवात आहे.

आणि हे तुम्ही कोण आहात? तुम्ही म्हणजे व्यक्ती? माझ्या मते व्यक्ती आणि मनुष्य प्राणी यात फरक आहे. व्यक्ती ही अत्यंत स्थानिक गोष्ट आहे, जी एखाद्या ठराविक देशात जगते, एखाद्या विशिष्ट संस्कृती, विशिष्ट समाज किंवा विशिष्ट धर्माशी जोडलेली असते. मनुष्य प्राणी ही काही स्थानिक बाब नाही. तो सर्वत्र आहे. जर व्यक्ती या जीवनाच्या अफाट पसाऱ्यातल्या केवळ एका कोपऱ्यात काही करत असेल तर त्याची कृती संपूर्ण विश्वाशी जोडली जाऊ शकत नाही. त्यामुळेच तुम्हाला हे समजून घ्यावं लागेल की आपण संपूर्णतेविषयी बोलत आहोत, त्याच्या एखाद्या छोट्या भागाविषयी नव्हे, कारण समग्रतेत छोटी गोष्ट सामावते, छोट्या गोष्टीत समग्रता नव्हे. व्यक्ती ही अत्यंत मर्यादित दु:खी, अवस्था अशी गोष्ट आहे जी तिच्या छोट्याछोट्या दैवदेवतांनी आणि त्यांच्या परंपरांनी समाधानी आहे, परंतु मनुष्य प्राणी हा समग्र कल्याण, सर्वांच दु:ख आणि या जगातील सार्वत्रिक गोंधळ या सर्वांशी संबंधित आहे.

आपण माणसं लाखो वर्षापासून आहोत तसेच आहोत, प्रचंड लोभी, ईर्ष्या करणारे, आक्रमक, चिंतातूर, निराश आणि क्षणभंगुर आनंदी आणि प्रेम करणारे. आपण तिरस्कार, भीती आणि हळुवारपणा यांचं विचित्र मिश्रण आहोत; आपण हिंसा आणि शांतता दोन्ही आहोत. जरी बैलगाडीपासून जेट विमानापर्यंत आपली मोठी प्रगती झालेली असली तरी मानसिकदृष्ट्या व्यक्तीत काहीही बदल झालेला नाही, जगभरातील सर्वच समाजांची घडण ही या व्यक्तिनेच निर्मिलेली आहे. ही बहिस्थ सामाजिक घडण आपल्या अंतस्थ मानसिक मानवी नातेसंबंधाचाच परिपाक आहे. आपल्यापैकी प्रत्येक जन हा सर्व भूतकाळाचा साठा आहे. व्यक्ती म्हणजे माणूस असणं, समग्र मानवजात असणं. संबंध मानवी समाजाचा इतिहास हा आपल्या आत लिहिला गेलेला आहे.

**प्र. २२. तुमच्या मते वरील उतारा कशा प्रकारचा आहे?**

१. थोतांड २. अंधश्रद्धा ३. अध्यात्मिक ४. बुवाबाजी

---

**प्र. २३. व्यक्ती आणि मानवजात याबाबतीत खालीलपैकी कुठली वाक्ये उताऱ्यातील आशयाला लागू होतील?**

अ. व्यक्ती आणि मानवजात यामध्ये व्यक्ती क्षुद्र आहे.

ब. व्यक्तींमध्ये संपूर्ण मानवजात सामावलेली आहे.

क. प्राचीन काळापासून व्यक्तिच्या प्रवृत्तीत फारसा फरक पडलेला नाही.

१. अ आणि क २. अ आणि ब ३. फक्त क ४. फक्त अ

---

**प्र. २४. देव आहे की नाही याच उत्तर कुणीच देऊ शकणार नाही या वाक्यातून उताऱ्यात काय सूचित केले आहे?**

१. देव असणं ही अंधश्रध्दा आहे.

२. देवाचं अस्तित्व असतं परंतु ते दिसत नाही.

३. देवाच्या अस्तित्वाविषयींचे प्रश्न आणि त्याची उकल करणे हा व्यक्तिचा आंतरिक प्रवास आहे.

४. २ आणि ३ दोन्ही

---


www.spandancareers.org

**प्र. २५. उताऱ्यात वर्णन केलेल्या लाखो वर्षापासूनच्या माणसांची प्रवृत्ती कशी आहे?**

१. तो भौतिकदृष्ट्या स्थितीशील आहे.

२. यामुळेच लाखो वर्षात तो काहीही आर्थिक प्रगती करू शकलेला नाही.

३. तो मुळचा सद्वर्तनी आणि गुणी आहे परंतु परिस्थितीने त्याला बिघडविले आहे.

४. यापैकी एकही नाही.

---

**प्रश्न क्रमांक २६ ते २९:**

संयुक्त राष्ट्रांच्या २० वर्षाच्या वाटाघाटीच्या इतिहासात प्रथमच असे वाटले होते की जागतिक तापमान वाढ २° च्या खाली ठेवण्याच्या उद्देशाने भरवण्यात आलेली राष्ट्रांची परिषद २१ (COP २१, पक्ष परिषद २१ किंवा पॅरिस वातावरणीय परिषद), वातावरणाबद्दल कायदेशीररित्या सर्वांवर बंधनकारक आणि काहीतरी ठोस जागतिक करार घेऊन समोर येईल. या COP २१ सहकार्य करारावरच्या चर्चेचा धुरळा हळूहळू बसू लागलाय. नेते आणि धोरणकर्ते आपापल्या घरी परतले आहेत. या कराराला ''ऐतिहासिक महत्वाचे वळण'' म्हणून त्याची स्तुती करत ते असेही म्हणतायत की त्यांनी, ''आपल्या मुलं आणि नातवंडांसाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे आणि ते हे ओळखतील की या ग्रहाला वाचण्यासाठी आपण आपले कर्तव्य केले आहे''.

खरोखर काय घडले याचा जरा एक आढावा घेऊया: प्रथमच असे झाले की ''वातावरणीय बदलापासून होणारे धोके आणि घातक परिणाम यांना ठोस स्वरूपात कमी करायचे असेल तर जागतिक सरासरी तापमान वाढ ही औद्योगिक पूर्व काळातील पातळीच्या वरती फक्त २° से. पर्यंतच वाढू देणे आणि नंतर या तापमान वाढीला १.५° इतक्या प्रमाणात मर्यादित करणे'' या मतापर्यंत या करारातील मुद्दे आले आहेत (पॅरिस करारातील अनुच्छेद २). पूर्वीच्या हरितगृह वायू उत्सर्जनात मोठा वाटा असणाऱ्या प्रामुख्याने अमेरिका आणि इतर देशांच्या सतत हे सत्य नाकारणाऱ्या वृत्तीला सोडचिठ्ठी देऊन टाकलेले हे एक महत्वाचे पाऊल आहे.

आयएनडीसी (योजनाबध्द राष्ट्रीय निर्धारित वाटा) याची निर्मितीच हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने वाट दाखवणे यासाठी आहे आणि इथेच खरंतर या उद्देशापासून दूर भटकण्याची किंवा फारकतीची सुरूवात होते. किंबहुना पॅरिस करारात म्हटलेच आहे, ''ही चिंतेची बाब आहे की सन २०३० मध्ये ५५ गिगाटन उत्सर्जन होईल आणि हेही व्यक्त करत आहोत की जर तुम्हाला जागतिक सरासरी तापमान वाढ औद्योगिक पूर्व काळातील पातळीच्या वरती केवळ २° से पर्यंत सीमित करायची असेल तर आयएनडीसी मधील तरतुदीपेक्षा खूप अधिक व्यापक उत्सर्जन कपातीचे प्रयत्न आवश्यक आहेत.''

आपल्याला याबाबतीत अगदी सुरूवातीपासूनच समस्या आहेत. उद्देश आणि त्या उद्देशापर्यंत पोचण्यासाठी आवश्यक असलेली बांधिलकी या दोहोमधील अंतर हे राष्ट्रीय आणि जागतिक दोन्ही पातळ्यांवर वाढत चालले आहे. याबाबतीत आणखी एक लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे या करारात कुठलीही कायदेशीररीत्या बंधनकारक तरतुदीचा समावेश केला गेला नाही.

**प्र. २६. वरील उताऱ्यावरून खालीलपैकी कुठले निष्कर्ष काढता येतील?**

अ. जगभरातल्या राष्ट्रांची हरितगृह उत्सर्जनात कपात करण्याची प्रामाणिक इच्छा आहे परंतु बहुसंख्य जनता सरकारांना तसे करू देत नाही.

ब. पॅरिस करारातील मुद्दे हे राष्ट्रांवरती बंधनकारक नाहीत.

क. आयएनडीसी मधील तरतुदी या जागतिक तापमान वाढीला आळा घालण्यासाठी पुरेशा नाहीत.

१. अ आणि क २. ब आणि क ३. फक्त अ ४. फक्त ब

---

**प्र. २७. उताऱ्यावरील लेखकाच्या मते पॅरिस करारासंबंधी कुठले विधान योग्य आहे?**

१. पॅरिस करार किंवा कॉप २१ हा पूर्णपणे फसलेला आणि निरूपयोगी करार आहे.

२. पॅरिस करारात उद्देश आणि प्रयत्न यांच्याबाबात अंतर्विरोध आहेत.

३. अमेरिका आणि इतर युरोपिय देश दांभिक आहेत.

४. भारताची याबाबतची भूमिका न्यायी आहे.

**प्र. २८. आयएनडीसीच्या तरतुदीनुसार जर अंमलबजावणी झाली तर कुठले परिणाम होतील?**

१. सरासरी जागतिक तापमान वाढ औद्योगिक पूर्व काळातील वाढीइतकी होईल.

२. सरासरी जागतिक तापमान वाढ औद्योगिक पूर्व काळाच्या पातळीपेक्षा २° से पर्यंत च्या मर्यादित वाढेल.

३. आयएनडीसीमुळे जगाचे तापमान आणखी वेगाने वाढेल आणि विनाशाची आपत्ती ओढावेल.

४. वरीलपैकी एकही नाही.

---

**प्र. २९. ''उद्देश आणि त्या उद्देशापर्यंत पोचण्यासाठी आवश्यक असलेली बांधिलकी या दोहोंमधील अंतर हे राष्ट्रीय आणि जागतिक दोन्ही पातळ्यांवर वाढत चालले आहे'' या वाक्यातून काय सूचित होते?**

१. मुळात राष्ट्रांची इच्छाच नाही की हरितगृह उत्सर्जनात कपात व्हावी.

२. संपूर्ण जागतिक पातळीवर विचार केल्यास तापमान वाढ त्यावरचे उपाय याबद्दलची वृत्ती ही साधारणपणे सर्व राष्ट्रांमध्ये समान दिसून येते.

३. अमेरिका आणि इतर प्रगत देश हे नेहमीच या कार्यात खोडा घालत आले आहेत.

४. १ आणि ३ दोन्ही

---

**प्रश्न क्रमांक ३० ते ३२:**

ज्याची सुरूवात वैदिक काळात पाहता येते असे भारतीय शास्त्रीय संगीत कदाचित जागतिक संगीताचे सर्वात प्राचीन प्रारूप असावे. वैदिक काळाच्या नेमक्या कालखंडाविषयी वादविवाद असले तरी बहुतेक इतिहासकार तो साधारणत: इ.स.पू. २००० पासून सुरू झाला असे मानतात. हिंदुंचा असा विश्वास आहे की निर्मितीची सुरूवात एका गूढ नादापासून झाली जो पुढे दोन चिन्ह म्हणजेच ओममध्ये परावर्तित झाला आणि त्यानंतर सर्वकाही घडले ते या स्वर्गीय ध्वनीमधून! यातून हेच सिध्द होते की, संगीत आणि वैदिक सभ्यतेच जुनं नात आहे.



www.spandancareers.org

वैदिक वाङ्मय बरीच वर्षे मौखिक स्वरूपात जतन करण्यात आले. त्यामुळेच वेद ''श्रुती'' म्हणून ओळखले जातात. याचा पायंड्याचा शिरकाव संगीत संस्कृतीमध्येही झाला आणि याचमुळे पुढे कितीतरी वर्षे कुठलेही लिखित स्वर उपलब्ध केले गेल नाहीत ते थेट थोर विद्वान विष्णू नारायण भातखंडे यांनी विसाव्या शतकाच्या सुरूवातीला त्यांची स्वर प्रणालीसमोर आणेपर्यंत! भारतीय शास्त्रीय संगीताची सर्व शिक्षण ही थोर अशा गुरू–शिष्य नात्यावर अवलंबून आहे. यात शिष्य आपल्या गुरूच्या घरी वर्षानुवर्षे राहून तपशीलवार आणि तांत्रिक बारकाव्यांचा मनापासून अभ्यास करतात आणि जेव्हा हा शिष्य प्रौढ होतो तेव्हा तो राजाश्रयाखाली आपली कला सादर करतो. याच वयात जर त्याला वाटले की, त्याने त्याच्या संगीतावर प्रभुत्व मिळवले आहे आणि तो आता ते शिकवू शकतो तर तो शिष्य मिळवून शिकवायला सुरू करतो आणि ती ''परंपरा'' चालू ठेवतो. या सगळ्या प्रक्रियेत कुठेही लिखित कागदपत्रे वापरली जात नाहीत; भारतीय संगीताचा इतिहास समजावून घेणे आणि तो उलगडणे या गोष्टी अवघड असण्यामागच्या अनेक कारणांपैकी हे एक कारण आहे.

आता आपण संगीताच्या काही मुलभूत वैशिष्ट्यांचा थोडा शोध घेऊया. पाश्चिमात्य शास्त्रीय संगीताशी तुलना केल्यास भारतीय संगीताच्या बाबतीत ठळकपणे जाणवणारी गोष्ट म्हणजे वाद्यवृंद आणि स्वरांमधील सहअस्तित्व किंवा सूरसंवादाचा अभाव. इथे कायमच गायक किंवा वादक यांच एकपात्री सादरीकरण असे, ज्यात ते तालवादकाच्या आणि दोन मुलभूत स्वर लावून बसलेल्या त्यांच्या विद्यार्थ्यांच्या साहाय्याने आपले स्वर किंवा संगीत सादर करीत असत. हे मुलभूत स्वर लावण्याचे वाद्य म्हणजे ''तानपुरा''.

**प्र. ३०. भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेतील गुरूंविषयी कुठले निष्कर्ष काढता येतील?**

१. ते आपल्या ज्ञानाविषयी फार संकुचित प्रवृत्ती असणारे होते.

२. आपले ज्ञान पुढच्या पिढ्यांना मिळू नये म्हणून ते सर्व स्वर लपवून ठेवीत असत.

३. स्वत:चे ज्ञान ते त्यांच्या शिष्यांद्वारेच पुढच्या पिढ्यांमध्ये वाटत असत.

४. १ आणि २ दोन्ही

---

**प्र. ३१. उताऱ्यावरून खालीलपैकी कुठले निष्कर्ष काढता येतील?**

अ. भारतीय संगीत हे ईश्वराशी पूर्णपणे एकरूप झालेले होते.

ब. पाश्चात्य संगीतापेक्षा भारतीय संगीताचा दर्जा हा नेहमीच खालचा राहिलेला आहे.

क. भारतीय संगीताचा इतिहास नीटपणे अभ्यासलेला गेला नाही.

१. अ आणि क　　२. फक्त क　　३. अ, ब आणि क　　४. यापैकी एकही नाही

---

**प्र. ३२. भारतीय संगीताच्या इतिहासाचा अभ्यास कठीण का आहे?**

१. कारण भारतीय शास्त्रीय संगीत मुळातच किचकट आहे.

२. गुरू–शिष्य परंपरेने ते जाणीवपूर्वक लपवून ठेवले आहे.

३. लिखित साहित्यनिर्मिती केली नसल्याने

४. वरील सर्व १, २ आणि ३

---

**प्रश्न क्रमांक ३३ ते ३५:**

जर आपल्याला शाश्वत आणि परिणामकारक पध्दतीने पृथ्वीची ऊर्जा, पाणी, खनिजे, मृदा आणि किनारी संसाधने आपल्या पुढच्या पिढ्यांपर्यंत पोचवायची असतील तर आपल्याला महासागराचा समावेश करत पृथ्वीला समजावून घेण्याची किंवा सर्वसमावेशक धोरण आखणे महत्वाचे आहे. वेगवेगळया घटकांकडे स्वतंत्र दृष्टीने पाहिल्याने कुठलेही ध्येय गाठता येणार नाही कारण कुठलेही स्वतंत्र प्रारूप हे पृथ्वी आणि सागरशास्त्र (जी हळूहळू एकमेकांत मिसळत आहेत.) यांच्यातील व्यामिश्रतेतील विविधतेचा समावेशक अभ्यास करण्यास असमर्थ असते.

यामुळेच भूशास्त्र आणि सागरशास्त्र यांचे एकमेकांवरील अवलंबित्व आणि घनिष्ठत्व समजावून घेणे अपरिहार्य झाले आहे. भूशास्त्र आणि सागरशास्त्र या दोहोंप्रती ठेवलेला सामाईक अभ्यासाचा मार्ग हा भूकंप, वादळे, पूर, त्सुनामी यासारख्या नैसर्गिक आपत्तींचे निदान आणि संचलन करण्यासाठी अत्यंत कळीचा मुद्दा ठरू शकतो.

पूर्वीच्या सागर विकास मंत्रालयाची पुनर्बांधणी करून जुलै २००६ मध्ये निर्माण करण्यात आलेले भूशास्त्र मंत्रालय (MOES) ही या संदर्भातील एक भारतातील महत्वपूर्ण घडामोड आहे. हे मंत्रालय हवामानशास्त्र, भूकंपविज्ञान, हवामान आणि पर्यावरण विज्ञान आणि त्यासंबंधित भूशास्त्रे ज्यात सागर विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचाही समावेश होतो, या सगळ्या बाबींशी निगडीत आहे.

ते पृथ्वीवरील महासागर, वातावरण आणि भूमी या वेगवेगळ्या व्यवस्थांसाठी एकात्मिक पध्दतीने उत्तमोत्तम सेवा (जशा–सागर संसाधने, सागरीय अवस्था, मान्सून, चक्रीवादळे, भूकंप, त्सुनामी, वातावरणीय बदल या क्षेत्रासंबंधी) पुरवण्याकरिता सुविधा उपलब्ध करते. भूशास्त्र मंत्रालय (MOES) भूव्यवस्था विज्ञान, मान्सूनचा अंदाज आणि इतर हवामानविषयक प्रमाणके, सागरीय अवस्था, भूकंप, त्सुनामी आणि भूविज्ञान घडामोडी या सर्व विषयातील संशोधनावरती देखरेख करते.

**प्र. ३३. उताऱ्यात उल्लेख केलेल्या भूशास्त्र मंत्रालयाची कार्ये सांगा?**

अ. पृथ्वी आणि त्यासंबंधीच्या वेगवेगळ्या भौगोलिक घडामोडी यांच्या अभ्यासासाठी सोयी सुविधा पुरविणे.

ब. 'वातावरणीय बदलासाठी' भारत शासनाला उपाय सुचविणे.

क. 'आपत्ती व्यवस्थापनाकरिता' अखिल भारतीय पातळीवरच्या संस्थेची निर्मिती करणे.

१. अ आणि ब　　२. ब आणि क　　३. फक्त अ　　४. अ, ब आणि क

---

**प्र. ३४. वरील उताऱ्यावरून खालीलपैकी कुठले निष्कर्ष काढता येतील?**

अ. भारतातील वेगवेगळ्या किंवा स्वतंत्र भौगोलिक शाखांमधील ज्ञानाची कमतरता आहे त्यामुळेच प्रत्येक शाखांमध्ये संशोधन संस्था निर्माण त्याला परवडणारे नाही.

ब. भूशास्त्र आणि त्यासंबंधीच्या वेगवेगळ्या शाखा यांच्या अभ्यासासाठी 'एकात्मिक' धोरणाची आवश्यकता आहे कारण प्रत्येक शाखेचा वेगळा अभ्यास हा त्यांच्याशी संबंधित समस्यांवर उपाय शोधण्याकरता पुरेसा नाही.

क. भूशास्त्र, सागर विज्ञान यांसारख्या वेगवेगळ्या भौगोलिक संकल्पना या एकमेकांशी संबंधित आहेत.

१. अ आणि ब　　२. ब आणि क　　३. फक्त अ　　४. फक्त क

---

**प्र. ३५. सागर विकास मंत्रालयाबाबत खालीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत?**

१. ते निरूपयोगी असल्याने शासनाने संपुष्टात आणले.

२. शासनाने अधिक व्यापक धोरणासाठी त्याची पुनर्बांधणी केली.

३. एक व दोन दोन्ही

४. भारताला मोठा सागरी किनारा लाभला नसल्याने भारतीय संदर्भात ते फारसे महत्वाचे नव्हते.

---

**प्रश्न क्रमांक ३६ ते ४०:**

वि.वि. आपले ता. १३ आहे मजकूरचे कृपापत्रासोबतचे विनंतीपत्र पावले. त्यावरून मोठा परमानंद झाला. परंतु माझ्या घालमोड्या दादा, ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यांस ते हक्क त्यांच्याने खुषीने व उघडपणे देववत नाहीत, व चालू वर्तनावरून अनुमान केले असता पुढेही देववणार नाहीत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकांतील भावार्थाशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही. कारण त्यांच्या पूर्वजांनी आम्हांवर सूड उगविण्याच्या इराद्याने, आम्हांस दास केल्याचे प्रकर्ण त्यांनी, आपल्या बनावट धर्म पुस्तकांत कृत्रिमाने दडपले. याविषयी त्यांच्यातील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहेत. यावरून आम्हां शूद्रादी अतिशुद्रांस काय काय विपत्ती व त्रास सोसावे लागतात, हे त्यांच्यातील उंटावरून शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारांस व मोठमोठ्या सभास्थानी आगंतुक भाषण करणारांस कोठून कळणार? हे सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकांस जरी पक्के माहीत होते, तरी त्यांनी फक्त त्यांच्या व आपल्या मुलाबाळांच्या क्षणिक हिताकरिता डोळ्यावर कातडे ओढून त्याला इंग्रज सरकारांतून पेनशन मिळतांच तो पुन: अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोंवळा बनून आपल्या शुद्रादि अतिशुद्रांस नीच मानू लागला; व आपल्या पेनशनदात्या सरकारने बनविलेल्या कागदाच्या नोटीससुद्धा सोवळ्याने बोट लावण्याचा विटाळ मानूं लागला! अशीच का शेवटी ते सर्व आर्य ब्राह्मण या हतभाग्य देशाची उन्नति करणार! असो, आता यापुढे आम्ही शूद्र लोक, आम्हांस फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुलणार नाहीत. सारांश, यांच्यात मिसळल्याने आम्हा शुद्रादि अतिशुद्रांचा काही एक फायदा होणं नाही, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे. अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणे असेल, तर त्यांनी एकंदर सर्व मानवी प्राण्यांत परस्पर अक्षय बंधुप्रीति काय केल्याने वाढेल, त्यांचे बीज शोधून काढावे व ते पुस्तकाद्वारे प्रसिद्ध करावे. अशा वेळी डोळे झाकणे उपयोगाचे नाही. या उपर त्या सर्वांची मर्जी. हे माझे अभिप्रायादाखल छोटेखानी पत्र त्या मंडळीच्या विचाराकरितां तिजकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. साधे होके बुढ्ढेका येह पहिला सलाम लेव.

**प्र. ३६. 'माझ्या घालमोड्या दादा' हे संबोधन उताऱ्यात कोणत्या अर्थाने वापरले आहे?**

१. उपरोधाने　　२. शिवीवाचक　　३. आत्यंतिक प्रेमाने　　४. ईर्ष्येने

---

**प्र. ३७. उताऱ्याचे लेखक ज्यांना उद्देशून बोलत आहेत त्यांच्याविषयी लेखकाचे अनुमान काय आहे?**

१. ते विचाराने प्रतिगामी आहेत.

२. ते भविष्यातही लवकर विचाराने पुरोगामी होण्याची शक्यता नाही.

३. त्यांचा बुद्ध्यांक कमी असून सामाजिक विषयांमध्ये त्यांना कमी गती आहे.

४. १ आणि २ दोन्ही

---

**प्र. ३८. उताऱ्याविषयी खालीलपैकी कुठला निष्कर्ष योग्य आहे?**

१. उताऱ्यावरील भाषा असंसदीय आहे.

२. शोषित वर्गाच्या हिताची व शोषण करणाऱ्यांना खडे बोल सुनावणारी ही भाषा आहे.

३. वरील १ व २ दोन्ही

४. यापैकी नाही.

---

**प्र. ३९. उताऱ्यावरील लेखकाचा महत्वाचा उद्देश काय सांगता येईल?**

१. वादविवाद करणे

२. सर्व मनुष्य समाजात परस्पर बंधुभाव व एकी घडवणे.

३. इतरांना सल्ले देणे.

४. शोषक वर्गावर सूड उगवणे.

---

**प्र. ४०. लेखकाच्या मते 'सार्वजनिक सभेचे' उत्पादक कसे आहेत?**

१. जात—पात मानणारे　　२. ब्रिटिशांविरूद्ध संघर्ष करणारे

३. सामाजिक सुधारणा घडवणारे　　४. सर्व मानवी प्राण्यात अक्षय बंधुप्रीति वाढवणारे

---

**Question number 41 to 45:**

It is reported that the government is close to finalizing a system of dual pricing for the public procurement of food grains. There would be two basic elements to this system: A fixed Mininum Support Price (MSP) covering the cost of cultivation, as at present, recommended by the Commission on Agricultural Costs and Prices (CACP), and variable procurement prices, at the discretion of the department of food, dependeing on market. For example, according to a working group of the Planning Commission, over the five year period ending 2001-02 when there was a steep rise in procurement price resulting in accumulation of embarrassingly large stock of food grains of over 60 million tones with the government, consumption of food grains in the country was reduced, on this account, by at least five million lons per annum. The new system by assigning a greater role for private trade can improve the efficiency in the distribution of food grains and substantially cut down subsidies, which can help to step up much needed public investment in agriculture. The proposed dual pricing system is a better alternative than total marketization of food grains trade by disbanding altogether public procurement at MSP.

Such a dismantling could lead to a crash in market prices of food grains in years of food harvest. Even though this may make exports competitive and raise domestic consumption of food grains in the short run, it may undermine food security by sapping producer incentives. The experience of green revolution underlines the importance of assured MSP, encouraging the farmers to step up their own investment and effort and derive full benefit from available infrastructure.

For the dual pricing system to yield desired results, it needs to be backed by several other policy measures. Since the impetus for cop diversification would be greater in the infrastructurally developed regions, like the north-west, this can slow down the growth of food grains output in the country and in particular, the surpluses procured, unless immediate measures are taken to strengthen public support for irrigation, technology, extension and credit in the rest of the country, especially in the central and eastern regions where there is a large potential for the growth of food grains where output has barely kept pace with population growth since the mid-90s. This also calls for more effective public procurement of food grains at MSP in these regions, as farmers have to often sell their produce immediately after the harvest at prices that are lower than MSP. Therefore, dual pricing system can be sustained only through non-price inventions such as infrastructural support for regional dispersal of growth in food grains output.

The new system requires better market intelligence forecasts as well as concurrent analysis on prices and sales in markets in India and abroad.

**Q. 41. As per the author, what amongst the following can be an impact of dual pricing system?**

a) Resulting in purchasing of food grain in greater quantities.
b) Will lead effective food grain distribution.
c) Will make exports competitive.
d) Can reduce food grain output.

1. a, b and c only 2. b, c and d only 3. a, c and d only 4. b only

---

**Q. 42. What are implied, highlighting points of the current system?**

a) Have poor food grain distribution system.
b) There is incentive for producers in terms of MSP.
c) Greater role of private players.
d) Food grain prices fairly remain steady in harvesting season.

1. a, b and c only 2. b, c and d only 3. a, b and d only 4. a, c and d only

---

**Q. 43. Does the writer support introduction of new dual pricing system.**

1. No 2. Yes 3. No clear information 4. Yes but with riders

---

**Q. 44. What actions/steps should be taken for effective new dual pricing system.**

a) Food grain procurement, is an efficient way, at MSP in infrastrucurally backward region.
b) Bulk food grain procurement.
c) Effective infrastructural development in terms of irrigation, technology, extension and credit.
d) Better market details with concurrent analysis of pricing and sales nationally and internationally.

1. a, b and d only 2. a, b, c and d only 3. a, b and c only 4. b and c only

---

**Q. 45. Do details of the passage indicate if Government is will to bring change?**

1. No 2. Yes 3. Can't say 4. Incomplete details

---

**Question number 46 to 48:**

Access to social security is a fundamental human right. While the country is experiencing faster growth in its Gross Domestic Product (GDP), a major concern is the balanced growth to bridge the gap between the rich and the poor. According to RBI, over 40% of Indians do not even have bank accounts. The national Sample Survey $59^{th}$ Round (2003) estimates reveal a disappointing fact that of the total cultivator households, only 27% have received credit from formal sources, and 22% from informal sources. The remaining 51% mostly marginal farmers-have virtually no access to credit.

It is in this context that, one needs to appreciate the role played by micro finance institutions (MFIs), in collaboration with government, NGOs, social organisations etc. in poverty alleviation, employment generation, improvement of women and their human development. Micro finance is seen as provision of financial service to mostly low-income people, especially the poor and very poor who are without any tangible assets.

**Q. 46. Which major concerns does this passage highlight?**

a) Credit access to marginal farmers.
b) GDP growth rate
c) Gap between rich and poor
d) Involvement of various institutions in the name of poverty.

1. c only 2. b and c only 3. a and c only 4. b and d only

**Q. 47. Who, according to passage, is playing the most important role in social improvement?**

1. NGOs 2. Social Organisations
3. Microfinance Institutions 4. Government

**Q. 48. Which of the following factors are highlighted in the passage?**

a) Empowerment of women
b) Poverty alleviation
c) Employment generation
d) Improvement of health and nutritional status of women.

1. a, b and c only 2. b, c and d only 3. a, b, c and d only 4. a, c and d only

**Question number 49 to 50**

The concept of biotechnology is a wide concept encompassing procedures modifying living organism as per necessity for the welfare of human beings. The living organisms are modified by various technical procedures for number of human requirements being such as domestication of animals, cultivation of plants and improving plat variety through various breeding practices. Modern technologies used for the purpose include techniques like cell, tissue culture and genetic engineering. The United Nations convention of Biological diversity defines 'biotechnology' as: Any technological application that uses biological systems, living organism of derivatives therof to make or modify products or processes for specific use. In other words, biotechnology can be defined as the application of technical advances in life science to develop various products.

Biotechnology also involves pure biological scientific displines such as genetics, microbiology, animal cell culture biology, biochemistry, embryology, cell biology and those outside the sphere of biology which include chemical engineering, bioprocess engineering, bioinformatics and biorobotics.

Conversely, modern biological sciences are intimately entwined and dependant on the methods developed through biotechnology and therefore all these together constitute of the life sciences industry. Biotechnology is research and development in the laboratory using bioinformatics for exploration, extraction, exploitation and production from any living organism and any source of biomass by means of biological engineering where high value added products could be planned, forecasted, formulated, developed, manufactured and marketed. These products should be used on sustainable basis and patent rights thereof must obtained. (legal protection at national and international level)

**Q. 49. Consider the following statements:**

a) Biotechnology is basically used for obtaining patents.
b) Biotechnology has nothing to do with economics.

Answer options:

1. Both are right 2. Both wrong
3. a is correct, b is not 4. b is correct, a is not

**Q. 50. Consider the following two statements:**

a) Biotechnology does not necessarily always involve organism or parts thereof:
b) Biotechnology basically involves both pure and marginally applied sciences.

**Answer options:**

1. Both are correct 2. Both are incorrect
3. a is correct, b is not 4. b is correct, a is not

**(प्र. ५१–५२) खालील माहिती काळजीपूर्वक वाचून उत्तरे द्या.**

A, B, C, D, E, F आणि G हे सात प्राध्यापक आहेत. प्रत्येकजण एक वेगळा विषय शिकवतो. जसे, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, इंग्रजी, गणित, अर्थशास्त्र आणि भूगोल (विषय अनुक्रमे असतील असे नाही.) प्रत्येकजण आठवड्यातील सोमवार ते रविवार या सात दिवसांत रोज एक दिवस शिकवतो. (अनुक्रमे नाही.) C शुक्रवारी जीवशास्त्र शिकवतात. B हे प्राध्यापक, जे प्राध्यापक भौतिकशास्त्र शिकवतात. त्याच्या एक दिवस अगोदर गणित शिकवतात. G हे रविवारी शिकवतात परंतु ते रसायनशास्त्र/इंग्रजी शिकवत नाहीत. D हे प्राध्यापक अर्थशास्त्र शिकवतात आणि ते F च्या एक दिवस अगोदर शिकवतात. A हे मंगळवारी भूगोल शिकवतात. E इंग्रजी शिकवत नाहीत.

**प्र. ५१. F कोणता विषय शिकवतात?**

१. भौतिकशास्त्र २. इंग्रजी ३. भौतिकशास्त्र किंवा इंग्रजी ४. माहिती अपूर्ण

**प्र. ५२. E कोणत्या दिवशी शिकवतात?**

१. सोमवार २. बुधवार ३. गुरूवार ४. माहिती अपूर्ण

www.spandancareers.org

**प्र. ५३. $a \Delta b = a^2 b$ (जर b = सम)**
**= $ab^2$ (जर b = विषम)**
**= ab (जर दोन्ही सम असतील.)**
**= $a^2b^2$ (जर दोन्ही विषम असतील.)**

$$\frac{(3\Delta 5)\Delta(6\Delta 7)}{(3\Delta 6)\Delta(5\Delta 7)} = ?$$

१. 9/343 २. 9/49 ३. 81/7 ४. यापैकी नाही.

---

**प्र. ५४. शरदच्या लग्नाचा दुसरा वाढदिवस ३ फेब्रुवारी २००२ रोजी रविवारी झाला तर, त्याचे लग्न कोणत्या दिवशी झाले असावे?**

१. शुक्रवार २. बुधवार ३. गुरूवार ४. शनिवार

---

**प्र. ५५. एका बॉक्समध्ये २ पांढरे चेंडू, ३ काळे चेंडू व ४ लाल चेंडू आहेत. बॉक्समध्ये हात घालून ३ चेंडू काढायचे आहेत, की ज्यात कमीत कमी एक काळा चेंडू असेल. असे किती वेळा करता येईल?**

१. ३२ २. ४८ ३. ६४ ४. ९६

---

**प्र. ५६. ८ व्यक्तींपैकी ७ व्यक्ती आपल्या जेवणावर प्रत्येकी ३० रू. खर्च करतात. तर आठवी व्यक्ती त्याच्या जेवणावर सर्वांच्या सरासरीपेक्षा १४ रू. जास्त खर्च करते. तर त्या आठ व्यक्तिंच्या जेवणाचा एकूण खर्च किती?**

१. २२४ रू. २. २४८ रू. ३. २४२ रू. ४. २५६ रू.

---

**प्र. ५७. एका दुकानदाराने दोन वस्तू प्रत्येकी १,५६० रूपयांना विकल्या. त्यावेळी त्याला एका वस्तूवर २०% नफा झाला. दुसऱ्या वस्तूवर ३०% नफा झाला. तर त्या वस्तू खरेदी करण्यासाठी दुकानदाराला किती रूपये द्यावे लागले?**

१. २,५०० रू. २. ३,१२० रू. ३. २,३४० रू. ४. १,९५० रू.

---

**प्र. ५८. P हा X चा भाऊ आहे. Z हा X चा मुलगा आहे आणि Q ही P ची मुलगी असून तिचे लग्न N शी झाले आहे. G व X या बहिणी आहेत. तर G चे Z शी नाते काय?**

१. मावशी २. बहीण ३. आई ४. सासू

---

**प्र. ५९. एका शब्द संयोजन यंत्राला विशिष्ट सामग्री दिल्यानंतर ती विशिष्ट नियमानुसार पुनः संयोजित करते. खाली दिलेली सामग्री आणि पुनः संयोजन यांचा नमुना दिला आहे.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिलेली सामग्री: | you | should | know | about | type | of | questions |
| पायरी १: | you | questions | should | of | know | type | about |
| पायरी २: | about | you | type | questions | know | should | of |
| पायरी ३: | about | of | you | should | type | know | questions |

आणि याप्रमाणे:

जर दिलेल्या सामग्री 'eight friends are sitting in the circle' आहे, तर वरील पायऱ्यांनुसार पायरी–५ काय असेल?

१. the circle in friends are sitting eight.
२. circle sitting are the in eight friends.
३. sitting friends the are circle in eight
४. circle friends sitting eight are in the.

---

**प्र. ६०. एका सांकेतिक भाषेत**

P $ Q म्हणजे P हा Q पेक्षा लहान आहे.
P * Q म्हणजे P हा Q पेक्षा लहान किंवा मोठाही नाही.
P # Q म्हणजे P हा Q पेक्षा मोठा किंवा समान आहे.
P % Q म्हणजे P हा Q पेक्षा मोठा आहे.
P @ Q म्हणजे P हा Q पेक्षा लहान किंवा समान आहे.
विधान: N#G, G%H, H#K
निष्कर्ष: 1) K$N 2) K@N

**वरील दिलेल्या माहितीवरून खालील प्रश्नातील कोणती निष्कर्षे निश्चितपणे सत्य आहेत, ते सांगा.**

**पर्याय:**

१. फक्त निष्कर्ष १ सत्य
२. फक्त निष्कर्ष २ सत्य
३. निष्कर्ष १ व २ दोन्ही सत्य
४. निष्कर्ष १ व २ दोन्ही असत्य.

---

www.spandancareers.org

**सूचना: प्रश्न क्र. ६१–६२: पुढील प्रश्न खाली दिलेल्या विधानांवर आधारित आहेत.**

**M, N, P, Q, R या पाच व्यक्ती असून,**

अ. एक व्यक्ती टेनिस खेळणारी, एक बुद्धिबळ खेळणारी व एक बॅडमिंटन खेळणारी आहे.

ब. M व Q या दोघी अविवाहित स्त्रिया असून कोणताही खेळ खेळत नाहीत.

क. दिलेल्या पाचात पती–पत्नीची एक जोडी असून त्यापैकी R हा पती आहे.

ड. स्त्रियांपैकी कोणीही बुद्धिबळ अथवा बॅडमिंटन खेळत नाहीत.

इ. N हा P चा भाऊ असून तो टेनिस किंवा बुद्धिबळ खेळत नाही.

**प्र. ६१. बॅडमिंटन खेळणारी व्यक्ती कोणती?**

१. M २. N ३. P ४. R

---

**प्र. ६२. पुढीलपैकी कोणता गट फक्त स्त्रियांचा आहे?**

१. MQR २. PNR ३. MPQ ४. PNQ

---

**सूचना प्रश्न क्र. ६३. एका सांकेतिक भाषेनुसार P, Q, R, S, T यांच्याबद्दल ५, ६, ७, ८, ९ हे अंक वापरले जात आहेत, पण दिलेल्या क्रमाने नव्हे. Q बद्दल ७ अथवा ९ यापैकी कोणताच अंक नाही. P साठी विषम तर R साठी पहिला सम अंक वापरला आहे. S बद्दल ५ किंवा ९ आहे. पण T बद्दल मात्र ७, ८, ९ यापैकी कोणताच नाही. या माहितीच्या आधारे प्रश्न सोडवा.**

**प्र. ६३. P [(Q + S)-(2R + T)] = ?**

१. ० २. ५ ३. १० ४. ७

---

**सूचना: प्रश्न क्र. ६४–६५: स्तंभ I मधील शब्दांची, एका विशिष्ट संकेताने होणारी सांकेतिक रूपे स्तंभ II मध्ये दिली आहेत. स्तंभ I मधील शब्दांच्या क्रमाप्रमाणे स्तंभ II मधील त्यांच्या सांकेतिक रूपांचा क्रम असेलच असे नाही. तसेच स्तंभ II मधील सांकतिक रूपामधील अक्षरेही मिसळून क्रम बदलून लिहिली आहेत. सांकेतिक भाषेचा संकेत ओळखून प्रत्येक प्रश्नापुढे दिलेल्या शब्दासाठी पर्याय उत्तरांमधून अचूक पर्याय निवडा व त्या–त्या पर्यायाच्या अनुक्रमांकाच्या चौकटीत फुली मारा.**

| **स्तंभ I** | **स्तंभ II** |
|---|---|
| TAPE | moij |
| COUP | lhhpok |
| TIE | nls |
| ROTATE | nhpk |
| SAY | nkpl |
| TREAT | msr |
| YEAR | khlph |
| SIP | hrp |
| TYRE | pmlh |

**प्र. ६४. SOUP**

१. osmj २. sojm ३. osjm ४. somj


---

**प्र. ६५. TRACE**

१. hiklp २. hlkip ३. hklip ४. kiplh

---

**सूचना: प्रश्न क्र. ६६–६७: पुढील आकृतीत दाखविल्याप्रमाणे एका चौरसाकृती शेतीच्या चार शिरोबिंदूवर A, B, C व D असे चौघेजण उभे आहेत. उत्तर दिशा आकृतीत दाखविल्याप्रमाणे आहे.**




आकृती नीट पहा. खाली प्रश्नात दिलेली माहिती लक्षात घेऊन त्यापुढे दिलेल्या चार पर्यायी विधानांपैकी अचूक विधान शोधा. संबंधित पर्यायाच्या अनुक्रमांकाच्या चौकटीत फुली मारा.

www.spandancareers.org

**प्र. ६६. आकृतीत दिलेल्या स्थितीपासून निघून A व B हे शेतीच्या कडेने, घड्याळाच्या काट्याच्या दिशेने, $2\frac{1}{2}$ बाजूएवढे अंतर चालून गेले. तर B व D हे घड्याळाच्या काट्यांच्या विरूद्ध दिशेने $1\frac{1}{2}$ बाजू एवढे अंतर चालून गेले. चौघेही एकाच वेळी निघून एकाच वेगाने गेले असतील तर या सर्व हालचालीनंतर पुढीलपैकी कोणते विधान सत्य आहे?**

१. D हा C च्या नैर्ऋत्येला आहे.
२. B व D च्या उत्तरेला आहे
३. B व C दक्षिणेच्या बाजूला एकमेकांना भेटतात.
४. A व C पूर्वेच्या बाजूला एकमेकांना भेटतात.


---

**प्र. ६७. प्रश्न क्र. ६६ मधील अंतिम स्थितीपासून निघून A व B हे शेतीच्या कडेने, घड्याळाच्या काट्याच्या दिशेने, अनुक्रमे $2\frac{1}{2}$ बाजू व $1\frac{1}{2}$ बाजूएवढे अंतर चालून गेले. तर C व D मात्र सरळ समोर शेतातून चालून शेत ओलांडून विरूद्ध बाजूस गेले. या सर्व हालचालीनंतर पुढीलपैकी कोणते विधान सत्य आहे?**

१. A व D एकाच ठिकाणी आहेत.  २. C हा D च्या ईशान्येला आहे.
३. A व B पूर्वेच्या बाजूला एकमेकांना भेटतात.  ४. D हा C च्या उत्तरेला आहे.

---

**प्र. ६८. प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य संख्या निवडा.**




१. १  २. ४  ३. १२  ४. ६

---

**प्र. ६९. पुढील तीन समीकरणांचा अभ्यास करा.**


अ. □ ○ = △
ब. □ = ○ ◇
क. △ △ = ◇ ◇ ◇

**वरील तीन समीकरणांनुसार पुढील कोणते विधान सत्य असेल?**

१. □ = ○ ○ ○ ○ ○
२. □ = ○ ○ ○ ○
३. □ = ○ ○ ○
४. □ = ○ ○

---

**प्र. ७०. पुढे दिलेल्या कागदापासून घडवू शकल्या जाणाऱ्या घनासारख्या वस्तू निवडा.**





A  B  C  D

**पर्यायी उत्तरे:**

१. फक्त अ आणि ब  २. अ, क, ड  ३. फक्त अ आणि क  ४. फक्त क आणि ड

---

**प्र. ७१. पुढीलपैकी एक व्यक्ती चुकीचे विधान करते. जर दोन व्यक्ती योग्य विधाने करत असतील, तर कोणत्या पक्षाने निवडणूक जिंकली?**

कमा = A किंवा B पैकी कोणत्याही पक्षाने निवडणूक जिंकली नाही.
नमा = A पक्षाने निवडणूक जिंकली.
पमा = A किंवा B पैकी एका पक्षाने निवडणूक जिंकली.

१. A  २. B  ३. दोन्ही पक्ष  ४. कोणताही पक्ष जिंकला नाही.


www.spandancareers.org

**प्र. ७२. दिव्या, राजा, बानो आणि मिता यांचे सरासरी वय ५ वर्षे आहे. राजाचे वय २ वर्षे आहे, बानो ६ वर्षाची आहे, आणि मिताचे वय ७ वर्षे आहे. दिव्या, तिची चुलत बहीण नयना, नयनाचा भाऊ निशी, तिची दुसरी चुलत बहीण प्रीति, तिचा जुळा भाऊ सौम्य आणि तिचा धाकटा भाऊ गुड्डू यांचे सरासरी वय १० वर्षे आहे. निशीचे वय १८ वर्षे आहे, प्रीति ६ वर्षाची आहे, गुड्डू वर्षाचा आहे. नयनाचे वय दर्शविणारा पर्याय निवडा.**


१. १४ वर्षे    २. १६ वर्षे    ३. २५ वर्षे    ४. २४ वर्षे

---


**प्र. ७३. घटक A शी एकरूप असलेला पर्याय निवडा.**




१.


२.


३.


४.


---

**प्र. ७४. एका सांकेतीक भाषेत EXCIETMENT हा शब्द TCERETNCME असा लिहिला जातो तर PHENOMENON हा शब्द कसा लिहिला जाईल?**

१. NSNMNOVELP
२. TKSNMNOVELM
३. NSNMMOVELP
४. LSNMMOVELM

---

**प्र. ७५. पुढे तीन विधाने व त्यापुढे (I), (II) व (III) या क्रमांकांची अनुमाने दिलेली आहेत. जरी सर्वसाधारणपणे ज्ञात तथ्यांच्या संदर्भात विधाने भिन्न वाटत असली तरी तुम्ही ती सत्य मानायची आहेत. त्यानुसार कोणती अनुमाने तर्कसंगत आहेत याचा निर्णय तुम्ही घ्यायचा आहे.**

**विधाने:** सर्व वाडगे चमचे आहेत.
एकही ताट चमचा नाही.
सर्व काटे ताटे आहेत.

**अनुमाने:** (I) एकही वाडगा काटा नाही.
(II) एकही चमचा काटा नाही.
(III) एकही वाडगा ताट नाही.

**पर्यायी उत्तरे:**

१. एकही तर्कसंगत नाही.
२. सर्व तर्कसंगत आहेत.
३. फक्त (I) व (II) तर्कसंगत आहेत.
४. फक्त (II) व (III) तर्कसंगत आहेत.

---

७६. तुम्ही एक उद्योगपती आहात. नवीन उद्योग सुरू करण्यासाठी तुम्हाला सरकाराच्या नियामक प्राधिकरणाकडून मंजूरीची आवश्यकता आहे. तुम्ही त्यासाठी लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून उद्योगाला मान्यता मिळावी म्हणून अर्ज केला आहे. अनेक महिने झाले तरी तुमच्या अर्जावर काहीच कार्यवाही झाली नाही व तुम्हाला उद्योगासाठी मान्यता मिळाली नाही. तुम्ही चौकशी केली असता मान्यता मिळवून देण्यासाठी त्या विभागातील अधिकारी तुमच्याकडे पैशाची मागणी करतात. पैशाची मागणी पूर्ण करणे हे तुमच्या आवाक्यात आहे तसेच मंजुरी न मिळाल्यामुळे तुमचे गेल्या अनेक महिन्यापासून आर्थिक नुकसान होत आहे. तुम्ही काय कराल ?

१) तुम्ही मगाणी केलेली रक्कम द्याल व मंजुरी मिळवाल. दिलेली रक्कम ही व्यवसाय करण्यासाठी आवश्यक गोष्ट आहे. असे समजून व्यवसाय खर्चात ती समाविष्ट कराल.

२) त्याच विभागातील एक वरिष्ठ अधिकाऱ्याला जो तुमच्या ओळखीचा आहे त्याला ह्या प्रकरणात लक्ष घालून लवकर मान्यता मिळविण्यासाठी प्रयत्न कराल.

३) त्या अधिकाऱ्याची बदली होण्याची वाट पाहाल व नवीन येणारे अधिकारी प्रामाणिक असेल अशी अपेक्षा कराल.

४) माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज करून तुमच्या अर्जाची स्थिती काय आहे व किती दिवसांमध्ये अशा उद्योगाला मान्यता दिली जाते याची माहिती विचाराल.

---

७७. तुम्ही जिल्हाधिकारी आहात. त्यावर्षीच्या अर्थसंकल्पात शहरातील औद्योगिक भागात एक रस्ता बांधण्यासाठी खर्च मंजूर झाला आहे. पण तुम्हाला अधिकारही देण्यात आले आहेत की गरज भासल्यास तो निधी इतर ठिकाणी रस्ता बांधल्यास तेथील आर्थिक वाढ होऊन सरकारी तिजोरीत कोट्यावधी रूपये येतील तसेच त्या भागातील असलेल्या रस्त्यांमुळे दररोज उद्योजकांचे नुकसान होत आहे. शहरातील रामनगर भागात एक झोपडपट्टी आहे. ही बेकायदेशीर आहे. शिवाय राजनैतिक वरदहस्तामुळे ती टिकून आहे. येथील कच्च्या रस्त्यावर दररोज अपघात होतात व काही वेळेस त्यांत मृत्यूही होतो. नवीन रस्ता झाल्यास हे टळेल त्यामुळे तो निधी या कामासाठी वळवावा अशी मागणी आहे. तुम्ही काय कराल?

www.spandancareers.org

१) निधी मंजुर कामासाठी खर्च करणार कारण झोपडपट्टी बेकायदेशीर आहे.
२) झोपडपट्टीत रस्त्यासाठी निधी वळवल्यास राजनैतिक फायदा ही होईल शिवाय तिला कायदेशीरही करून घेता येईल.
३) झोपडपट्टीत रस्ता बांधणार कारण यामुळे अनेक जीव वाचतील यामुळे औद्योगिक नुकसान झाले तरी चालेल.
४) औद्योगिक भागात रस्ता बांधण्यासच निधी वापरणार पण त्याबदलात उद्योजकांना सामाजिक बांधिलकीद्वारे झोपडपट्टीत रस्ता बांधण्यास राजी करणार.

---

७८. अनिरूद्धचा नौकरी करण्यापेक्षा बिझनेस करण्याकडे जास्त ओढा, त्यामुळे वडिलांचा नकार असतानादेखील हातातील बऱ्या पगाराची नोकरी सोडून अनिरूद्धने रेडीमेड कपड्यांचा बिझनेस सुरू केला व तो बिझनेस हळूहळू गती घेतोय, पण त्याच्या वडिलांची नकारात्मक भूमिका कायम आहे. अनिरूद्धला मदतीसाठी विश्वासू व्यवस्थापक अजून उपलब्ध झालेला नसल्यामुळे मालाच्या विक्रीचा हिशेब, कर्जाचे हप्ते, इन्शुरन्स, नोकर माणसांवर देखरेख अशी सगळी जबाबदारी त्याच्या एकट्यावरच पडते आहे. त्यामुळे धंद्याशी निगडित महत्वाचे निर्णय घेताना अनिरूद्धला अस्वस्थता व दडपण जाणवते. परिणामी अलीकडे त्याचा चिडचिडेपणा खूप वाढलाय. अशावेळी अनिरूद्धने नेमके काय करावे ?
१) अनिरूद्धला जर धंदा करण्याचे झेपत नसेल, तर सरळ वडिलांच्या इच्छेनुसार पुन:श्च नोकरीला सुरूवात करावी.
२) अनिरूद्धने सद्य परिस्थितीमध्ये धंद्याशी निगडित निर्णयाची जोखीम घेऊन निर्णयाच्या चांगल्या व वाईट अशी दोन्ही परिणामाची स्वत:ला स्पष्ट कल्पना द्यावी.
३) अनिरूद्धने कोणताही कमीपणा न मानता वडिलांना आपल्या बिझनेसमध्ये मदत करण्यास सुचवावे.
४) अनिरूद्धने व्यवस्थापक पदाच्या भरतीसाठी जाहिरात द्यावी.

---

७९. एका मोठ्या व्यवहारामध्ये एका शासकीय अनुदानित साखर कारखान्यास प्रचंड तोटा (Heavy Loss) झाला. तोटा कोणामुळे झाला याची कारणमीमांसा करण्यासाठी चौकशी चालू झाली. संबंधित निर्णयपक्रीयेत चार अधिकारी समाविष्ट होते. जेव्हा चौकशी मध्ये प्रश्नोत्तरे झाली तेव्हा Team – Leader ने आपले सहकारी व कनिष्ठ (Collegues & Subordinates) यांना दोषी ठरविले, कारण Team – Leader ची बाजू वरील ठिकाणी समर्थनीय (Justifiable) आहे का ?
१) तो असे कारण देऊ शकतो.
२) प्रत्येक निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब Team - Leader चे असल्यामुळे अंतिम जबाबदारी त्यालाच घ्यावी लागते.
३) वरिष्ठ Team – Leader ला सर्वच वाचण्यास वेळ नसतो त्यामुळे तो सहकारी व कनिष्ठांवर विश्वास ठेवून अंतिम शिक्कामोर्तब करतो. (Takes Final Decision)
४) येथे Team – Leader च्या साध्या स्वभावाचा फायदा उचलला गेला.

---

८०. तुमच्या खात्यामध्ये अधिकृतरित्या चहापानासाठी दुपारी सुट्टी दिली जात नाही. तरीही खात्यामधील काही पर्यवेक्षक दुपारी छोटी सुट्टी देतात तर काहीजण देत नाहीत. जे पर्यवेक्षक सुट्टी देत नाहीत त्यांच्या हाताखाली काम करणारे लोक अन्याय होत असल्याची सतत तक्रार करतात. त्या खात्याचे संचालक म्हणून ही समस्या सोडवण्यासाठी तुम्ही खालीलपैकी कोणता पर्याय वापराल ?
१) सर्व कर्मचाऱ्यांसाठी दुपारच्या चहापानाच्या सुट्टीचे वेळापत्रक आखून द्याल.
२) सर्व कर्मचाऱ्यांना दुपारच्या चहापानाच्या सुट्टीचे घेण्यास मनाई कराल.
३) प्रत्येक पर्यवेक्षक आणि त्याच्या हाताखालील कर्मचाऱ्यांना चहापानाची सुट्टी घ्यावी की नाही याचा निर्णय घेण्याचा अधिकार द्याल.
४) सर्व कर्मचारी जे चहापानाची सुट्टी घेतात त्यांच्या जेवणाच्या सुट्टीच्या वेळेत कपात कराल.

---

**SPACE FOR ROUGH WORK**

www.spandancareers.org